तस पाहिलं तर लोकगीते ही अशिक्षित लोकांची गीतरचना असल्याने आदर्श वाङ्मयाचे सारेच गुण आपण त्यांना लावू शकत नाही. पण तरीही गीतांची निर्मिती उत्स्फूर्तपणे झाली आहे आणि स्त्रियांच्या अंतर्गत उमाळ्यातून आलेल्या या भावना असल्याने तसेच त्यातील नैसर्गिकपणामुळे या गीतांचे सौंदर्य वेगळेच आहे हे मान्य करावे लागते.

प्रकरण ७ वे

निष्कर्ष

प्रकरण ७ वे
निष्कर्ष

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या 'वऱ्हाडी लोकगाथा' या पुस्तकातील 'स्त्री विश्व' या शीर्षकाखाली प्रबंध लिहिताना एकूण ६ प्रकरणांमध्ये याची विभागणी केली. त्यातील प्रत्येक प्रकरणाचे विवेचन करताना, त्यातून अपेक्षित माहिती मिळविताना अनेक गोष्टी नजरेस आल्या. त्यातून मला जाणवणाऱ्या घटकांतून प्रत्येक प्रकरणाविषयी काही मत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबद्दलचे विवेचन खालील प्रमाणे –

'लोकसाहित्य व लोकगीते यांच्या व्याख्या व स्वरूप' हे प्रकरण लिहिताना त्यातील लोकसाहित्याचे स्वरूप पाहताना, त्याचा अभ्यास करताना लोकसाहित्याचे क्षेत्र किती व्यापक आहे याची कल्पना येते. आता जे आपण आधुनिक साहित्य म्हणतो म्हणजेच कथा, कविता, कादंबरी या साहित्याची मुळे खऱ्या अर्थाने लोकसाहित्यात दडलेली आहेत. असे वाटते. कारण लोकसाहित्य हे अतिप्राचीन आहे. त्याची परंपराही तितकीच प्राचीन असल्याचे येथे जाणवते. लोकसाहित्याच्या उत्पत्तीचा शोध घेता आदीकालापर्यंत जावे लागते. जेव्हा भाषा निर्माण झाली तेव्हा हे लोकसाहित्य जन्माला आले असेही म्हटले जाते.

लोकसाहित्य हे फार प्राचीन आहे असे सर्वच लोकसाहित्य विशारदांचे मत आहे. कारण १८ व्या शतकात युरोपमध्ये प्रथम लोकसाहित्याच्या संशोधन आणि संकलनाला सुरूवात झाली. तेव्हापासून अनेक पाश्चात्य विशारदांनीच मुख्यत्वे याच्या अभ्यासाला सुरूवात केली. त्यात रूसीच्या 'Social Contact' या ग्रंथामुळे लोकसाहित्याची आवड सर्वप्रथम निर्माण झाली. या आवडीतून त्यांच्या अभ्यासालाही चालना मिळत गेली. यात प्रामुख्याने ग्रीम बंधु, मॅक्स म्युलर, बेनफे, टायलर व लॅग, ह्युमरेस, सिग्मंड फ्राईड, जॉन बॅलिस, बॉटकिन, फॉस्टर, फ्रान्सिस

पॉटर वगैरेंनी लोकसाहित्याच्या अभ्यासाविषयी विविध संप्रदाय निर्माण केले व लोकसाहित्याची व्याख्याही करण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्यांच्या अनुकरणातून महाराष्ट्रातही १८५८ मध्ये लोकसाहित्य अभ्यासास प्रारंभ होऊन राजवाडे, रा.चि. ढेरे, दुर्गा भागवत , सरोजिनी नायडू वगैरेंनी मोलाची कामगिरी केलेली दिसते.

लोकसाहित्य हे व्यक्तिनिर्मित नसून समूहनिर्मित आहे. लोकसाहित्याचे विविध प्रकार, त्याची वैशिष्टयेही या प्रकरणात अभ्यासली त्यामुळे लोकसाहित्याची व्याप्ती केवळ लोकगीत, लोककथा पुरती मर्यादित नाही हे जाणवले. त्याचबरोबर या लोकसाहित्याच्या अध्ययनाची, संकलनाची गरजही वाटते. विज्ञान युगात जरी आपण वावरत असलो तरी विज्ञानामुळे सर्व सोयी सुविधा मिळतील पण जीवनातील आनंद व मनोरंजनासाठी प्रेम, माया, जिव्हाळ्याच्या भावनेने ओथंबिलेल्या या लोकसाहित्याचीही ओळख करून घेऊन त्याचे अध्ययन करणे आवश्यक आहे.

लोकगीते हा लोकसाहित्याचाच एक भाग आहे. लोकसाहित्य म्हणजे लोकगीते असा काहींचा समज झाला आहे कारण लोकगीते खूप प्राचीन असून त्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात आहे. लोकगीतांचे प्रचंड दालन, विविध गुणवैशिष्टयांनी नटलेले आहे हे जाणवले. त्यातही स्त्रियांची निर्मिती अधिक आहे. यातुन स्त्रियांच्या भाव-भावना, सुख दु:खे व्यक्त झाली आहेत. त्यावरून जर एखादया प्रदेशाची लोकसंस्कृती जाणून घ्यावयाची असेल तर तेथील लोकगीतांचा अभ्यास अतिशय आवश्यक ठरतो हे येथे नमूद करावेसे वाटते.

तसेच लोकगीतांतील सौंदर्यच इतके विलक्षण आहे की, या आधुनिक कालप्रवाहात त्यांना पुन्हा सन्मानाने आणले जाईल. त्याची गोडी सर्वांनाच वाटेल याची खात्री आहे.

''डॉ. प्रतिमा इंगोले यांचा परिचय, वाङ्मय आणि 'वऱ्हाडी लोकगाथेचे' स्वरूप'' हे प्रकरण अभ्यासताना प्रतिमा इंगोले यांच्या नावातच मोठी प्रतिभा असल्याचे दिसते. कारण या प्रतिमेतील प्रतिभा केवळ एकाच वाङ्मय प्रकारापुरती

मर्यादीत न राहता कथा, कविता, कादंबरी, वैचारिक, बालवाङ्मय या सर्वच वाङ्मयात फुलून बहरून निघाली आहे असे वाटत. खरचं प्रतिमा इंगोले यांच्या सर्वच वाङ्मयातील लेखनाने महाराष्ट्रातील अग्रगण्य लेखकात त्यांचेही नाव घ्यायलाच हवे इतके त्यांचे वाङ्मय समृध्द आहे. प्रतिमा इंगोले यांच खास वैशिष्टय म्हणजे त्यांची वऱ्हाडी बोली. प्रतिमा इंगोले म्हटल्या की वऱ्हाडी बोली आठवतेच आठवते. कारण त्यांच बरचसं लेखन हे वऱ्हाडी भाषेतूनच झालं आहे. त्यांच्या बालपणाबद्दल त्यांची प्रेरणास्थान असणारे आजोबा आणि आई तसेच अकोल्याच्या (जन्मगाव) वऱ्हाडी बोलीविषयी आपल्या बऱ्याच पुस्तकातून त्या लिहतात. त्यावरून त्यांच खडतर बालपण पण त्यातूनही तरून जाऊन शिक्षण घेत, लिहिण्याचा छंद जोपासत या प्रतिमाताई मराठीच्या प्राध्यापिका बनल्या हा त्यांचा एकूण प्रवासच प्रेरणादायी वाटतो.

कथालेखन त्यांचा आवडता प्रांत तर लोकसाहित्य त्यांचा आवडता अभ्यास विषय. त्यामुळे लोकसाहित्याविषयी त्यांचे लेखन संकलनही चालू आहे. त्यातून 'वऱ्हाडी लोकगाथा' हे पुस्तक सिध्द झाले आहे. त्याबरोबरच त्यांचे काही कथासंग्रह, कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. एवढेच नव्हे तर एकूण २५-३० पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. त्यावरून त्यांच्या वैशिष्टयपूर्ण लेखनाची कल्पना येते. ग्रामीण त्यातच स्त्रियांवर त्यांच अधिक चिंतन आणि लेखन आहे. स्त्रियांकडे पाहण्याची आधुनिक विचारसरणी कशी असावी, समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा हरवत चाललेली माणुसकी, अन्याय, अत्याचार सर्वांचेच दर्शन त्यांच्या वाङ्मयातून होते. तसेच वऱ्हाडी भागातील सण, उत्सव, विधी याबाबतची त्यांना खूपच माहिती आहे. त्यावरून सूक्ष्म निरीक्षण करण्याची त्यांची वृत्ती दिसून येते. म्हणजेच या सर्वांतून त्यांची चौकस दृष्टी लक्षात येते.

'वऱ्हाडी लोकगाथा' यामध्ये वऱ्हाडी लोकगीतांचा सामावेश आहे तेव्हा पुस्तकाचे स्वरूप पाहताना त्यांचे अंतरंग व बहिरंग या दोन्हींचा विचार केला आहे.

त्यावरून वाङ्मयीनदृष्टया हे पुस्तक फारच सुंदर आहे. अनेक प्रकारची गीते, त्यातुन प्रतित होणारा आशय व होणारे स्त्री जीवनाचे दर्शन यावरून या पुस्तकाचे अंतरंगही समृध्द असल्याचे जाणवते. एकूणच वऱ्हाडी लोकसंस्कृती पाहण्यासाठी हे उपयुक्त साधन आहे.

'''वऱ्हाडी लोकगाथे'मधील स्त्रियांचे कौटुंबिक जीवन'' हे प्रकरण अभ्यासताना स्त्रियांच्या कौटुंबिक, नातेसंबंधावर आधारित गीतांचा शोध घ्यावासा वाटला. त्यातुन मातृत्व विषयक, सासर-माहेर विषयक, कुंकू महात्म्य विषयक, स्त्रियांमधील समभाव दर्शक, भेदभावदर्शक अशी बरीच गीते पाहायला मिळाली. त्या गीतांचा बारकाईने अभ्यास केला असता या वऱ्हाडी स्त्रियांनी आपले कौटुंबिक जीवनच समोर मांडले आहे असे वाटते कारण या गीतांतील बहुसंख्य गीतांतून स्त्रियांनी आपले सुख-दुःख, आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यामध्ये स्त्री मुलगी असताना, आई असताना, सुन, सासू असताना, वहिनी, जाऊ, बहीण असतानाच्या वेगवेगळ्या भावना व्यक्त झाल्या आहेत.

या वऱ्हाडमधील स्त्रिया आपण आई होणे ही अनमोल गोष्ट मानतात आणि मूल झाल्यावर मुलांच्या प्रेमात, कौतुकात दंग होतात. त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करताना दिसतात. मुलगा व मुलगी यांना या स्त्रिया समानच मानतात. पण घरातील व्यक्तीच्या पुढे काही चालत नसल्याने वंशाला दिवा असावा असेही त्याचं मत आहे. पण या दोघांवरही ती प्रेमाचा वर्षाव करताना दिसते. त्याचे चित्रण अनेक ओव्यांतुन आले आहे. हीच स्त्री जेव्हा सुन म्हणून परघरी जाते तेव्हा मात्र तिच्या जीवनाची फरपट सुरू झालेली दिसते कारण सुनेला होणारा त्रास व सासुरवास याचं ओव्यांतून झालेले चित्रण पाहून मन व्याकुळ होत. स्त्री मग ती कुठलीही असो

'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

हृदयी अमृत नयनी पाणी' ही उक्ती तिच्या बाबतीत खरीच ठरते.

त्यामुळे या स्त्रियांना माहेरची ओढ अधिक आहे. माहेरचे आई-वडील-भाऊ-भावजय या सर्वांविषयी ती भरभरून बोलताना दिसते. आईच्या प्रेमाचे गोडवे ती नेहमी गात राहते व सदैव माहेरच्या आठवणीत रमलेली दिसते. कारण तिला हवे असणारे प्रेम, आपुलकी मिळत नाही. पण सौभाग्यासाठी ती आपली सर्व कर्तव्य पार पाडत संसार करताना दिसते.

अशा या वऱ्हाडी स्त्रीची अनेक रूपे, अनेक नात्यांबद्दलच्या तिच्या भावना, तिचे विचार, तिची सुख-दुःखे या गीतांतून ठायी ठायी व्यक्त झाल्याचे जाणवते. त्याचबरोबर कित्येक वर्षापाठीमागची ही वऱ्हाडी स्त्री आणि आजची आधुनिक स्त्री यांना मिळणाऱ्या वागणूकीत काही फारसा बदल झाला आहे असे वाटत नाही. पण शिक्षणामुळे समर्थ झालेली स्त्री याला धाडसाने सामोरी जाते आहे हे मात्र नक्की.

''वऱ्हाडी लोकगाथेतील स्त्रियांचे सामाजिक जीवन'' हे प्रकरण अभ्यासताना त्यासाठी आवश्यक अशी सामाजिक आशयाची अनेक गीते या संग्रहात सामाविष्ट असलेली दिसली. यामध्ये सामाजिक दृष्टीकोन असणारी गीते, ऐतिहासिक, पौराणिक गीते, कृषीगीते, तत्वज्ञान विषयक, बदल दर्शविणारी गीते, ठावा गीते वगैरे गीतांचा सामावेश होतो. या गीतांच्या आधारे स्त्रियांचे सामाजिक जीवन अभ्यासताना एकूण समाजव्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम दर्जा दिलेला दिसतो. पुरूषाप्रमाणे स्त्री देखील समाजाचा एक घटक आहे याचा तत्कालिन समाज व्यवस्थेला विसर पडलेला दिसतो. त्यामुळेच ही पुरूषप्रधान संस्कृती स्त्रीवर बराच अन्याय करताना दिसते.

मुख्य गोष्ट म्हणजे स्त्रीचे अस्तित्व, तिचा जन्मच नाकारण्याचे धाडस हा वऱ्हाडी समाज करतो. मुलगी झाली म्हणून तिच्या मरणाविषयी बोलणारा बाप याच समाजात भेटतो. पण हीच स्त्री समाजाचा आधारस्तंभ आहे, तिच्यामुळेच समाजसातत्य चालू आहे हे मात्र तो विसरला आहे आणि स्त्रीला दुय्यम मानली आहे त्यामुळेच तेथील पुरूषव्यवस्थेचा ती गुलाम झालेली दिसते.

पण त्याही परिस्थितीत आपल्या कर्तव्यात ती कसूर करत नाही. समाजाला कुटुंब व्यवस्थेतर्फे बांधून ठेवण्याचा ती प्रयत्न करते. मुलांना शिक्षण मिळावं यासाठी ती प्रयत्न करते. त्याबरोबरच सामाजिक रूढी-परंपरा, रितीरिवाजांचेही ती पालन करताना दिसते. समाजातील आधुनिक विचारांची तिला ओढ असल्याचे दिसते. तसेच तत्वज्ञानविषयक सारख्या गीतांतून तिचे अनुभव विश्व किती समृध्द आहे याचीही खात्री पटते. तसेच कर्तृत्ववान स्त्रियांची परंपरा असलेल्या या वऱ्हाडची समाजव्यवस्था किती मागासलेपणाची होती हे दिसते. पण त्यातही समाधान मानणारी भोळी वऱ्हाडी स्त्री देखील येथे दृष्टीस पडते.

''वऱ्हाडी लोकगाथेतील स्त्रियांचे सांस्कृतिक जीवन'' हे प्रकरण अभ्यासताना सांस्कृतिक आशयाच्या गीतांचे सहाय्य घेतले त्यामध्ये सण-उत्सव-गीते, भुलाई गीते, लग्नगीते, डहाका गीते, संत गौरव, देवदेवतांविषयक गीते या गीतांचा सामावेश होता. त्याआधारे स्त्रियांचे सांस्कृतिक जीवन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

वऱ्हाडी स्त्री असो किंवा अन्य कोणतीही स्त्री असो स्त्रियांची मूळ प्रवृत्तीच सात्विक, धार्मिक, श्रध्दाळू तसेच अध्यात्मवादी असते याचे प्रत्यंतर या प्रकरणाचा अभ्यास करताना जाणवते. वऱ्हाडमध्ये अनेक प्रकारचे सण, उत्सव साजरे केले जात अशा वेळी कधी विधी प्रसंगी तर कधी जात्यावर दळण दळताना या वऱ्हाडी स्त्रिया सण-उत्सवाची गीते गातात. त्यामुळे कौटुंबिक व सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या बऱ्याच उत्सवात स्त्रिया सहभागी होतात.

भुलाई उत्सव, झेंडवाई उत्सव तसेच लग्न समारंभ यामध्ये सहभागी होणे हे स्त्रियांसाठी मोठी आनंददायी गोष्ट आहे कारण दैनंदिन कामाच्या रगाड्यातून या स्त्रियांना सुटका मिळत असावी. या विरंगुळ्यातूनच त्या सुखाचे चार क्षण शोधताना दिसतात. तसेच या देवदेवतांच्या गीतांमधून त्यांच्याविषयी भक्तिभाव प्रकट करताना आपली सुख-दु:खेही स्त्रिया व्यक्त करतात. मात्र हे करताना आपली दु:खे

देवतांच्या माध्यमातून व्यक्त करतात व अनेक देवदेवतांना मानवी रूप देऊन त्यांचे अलौकिकातुन लौकिकात रूपांतर केल्याचे दिसते. मग कधी सीतेचे, कधी द्रौपदीचे तर कधी राधा-गवळणींचे दु:ख त्या मांडतात व त्यातुनच आपल्या दु:खाचे प्रदर्शन घडवितात.

वऱ्हाडमधील संत, साधु यांवरील ही स्त्रीची श्रध्दा येथे व्यक्त झाली आहे. तसेच डहाका, भुलाई, ठावा गीतांसारखे वऱ्हाडमधील वैशिष्टयपूर्ण गीतप्रकारही येथे पाहायला मिळतात. तसेच यातील अनेक गीतांतून या उत्सवाच्या साजरीकरणातुन स्त्रियांना आनंदप्राप्ती होते हे नक्की. तसेच त्यातून तिची श्रध्दाळू वृत्ती प्रकट होते. ही वृत्ती संस्कृती वाढविण्यासाठी व टिकवून ठेवण्यास मदत करते.

''वऱ्हाडी लोकगाथेमधील संग्रहित लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्यमापन'' हे प्रकरण अभ्यासताना पुस्तकाच्या अंतरंग व बहिरंगाचा विचार केला. त्यामध्ये मुखपृष्ठ, मलपृष्ठ, रेखाचित्रे, पुस्तकाची भाषा, उपमा, म्हणी, उखाण्याची रचना, समाविष्ट गीते या सर्व घटकांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील सर्व गोष्टींचा आढावा घेतल्यानंतर वाङ्मयीन दृष्टीने 'वऱ्हाडी लोकगाथा' हे पुस्तक फारच सुंदर आहे असे वाटते. यातील सर्व गीते वऱ्हाडी असल्याने अर्थातच स्त्रियांच्या वऱ्हाडी बोलीतच ही सर्व गीते आली आहेत. त्यामुळे वऱ्हाडी बोलीचा गोडवा, लयबध्दता, लवचिकता अनुभवायला मिळते. तसेच यामधील गीते विविध उपमांमुळे नटली आहेत. काही म्हणींचे दर्शन यातून घडते. तसेच उखाण्याप्रमाणे काही ओवीगीतांची रचना आढळते. स्त्रियांच्या तोंडचे अस्सल ग्रामीण वऱ्हाडी शब्दांमुळे तर या गीतांतील सौंदर्य आणखी वाढलेले दिसते.

मुखपृष्ठाची रचना, त्यावरील चित्र एकूण रंगसंगती आकर्षक आहे. मलपृष्ठावरील विचारही पुस्तकाबाबतची उपयुक्तता व्यक्त करतो. मध्यंतरी प्रतिमाताईंनी रेखाटलेली रेखाचित्र सुबक आहे. अनेक संस्कृतीदर्शक रांगोळ्या, चित्रांचा यातील सामावेश पुस्तकाच्या सौंदर्यात भर घालतात. तसेच गीतांमधील

विविधता आणि त्यातील आशय यामुळे ही गीतेही समृध्द आहेत. स्त्रियांच्या अंतरीच्या उमाळ्यातुन ही गीते सहजपणे बाहेर पडली असल्याने याचे सौंदर्य वेगळेच आहे. तरीही वाङ्मयीन दृष्टीनेही पाहिल्यास हे पुस्तक सरस वाटते.

वाङ्मयीन मूल्यमापनात या गीतांचे आशय सौंदर्य हा देखील एक मोठा घटक आहे. गीतांतून प्रतीत होणारा आशय सुंदर तर आहेच पण त्याबरोबरच तो आशय वऱ्हाडी स्त्रीचे जीवनच आपल्यासमोर उभे करतो. त्यामुळे वऱ्हाडी स्त्रीची अनेक वैशिष्टये या संग्रहातून दिसून येतात. तसेच इतर स्त्रियांपेक्षा तिचं काही वेगळेपणही दिसते. वऱ्हाडी स्त्रीचे कौटुंबिक जीवन पाहताना तिचे प्रेमळ व्यक्तिमत्व समोर येते. अत्यंत दयाळू, सहनशील, कृतज्ञ स्त्री या गीतांच्या माध्यमातून व्यक्त होते. आपल्या मुलाच्या सहवासात, त्याच्या कौतुकात ती दंग असते यामुळे तिला आपल्या कष्टांचाही विसर पडतो. सासूचा जाच, घरातील व्यक्तींची हेटाळणी ती सहन करते कारण आपल्याला याच सासूमुळे पती मिळाला आहे याची तिला जाणीव आहे म्हणून सासू-सासरा त्रास देत असूनही त्यांना आई-वडीलांप्रमाणे मानून, तुळशीप्रमाणे मानून त्यांच्याबद्दल सुख चिंतते. पण कधी कधी हाच पती त्रास देऊ लागतो तेव्हा तिला दु:ख अनावर होत पण पतीला परमेश्वर मानण्याची श्रध्दा तिच्यात आहे त्यामुळे या सर्वांकडे ती दुर्लक्ष करताना दिसते मात्र स्त्रीला सर्वात प्रिय असणाऱ्या आईला कोणी बोलले तर ती प्रतिकार करते, विरोध करते तर कधी सासूलाही प्रतिउत्तर देण्याचा ती प्रयत्न करते. यावरून ती सोशिक आहे पण वेळ येताच ती उलट बोलूही शकते असे वऱ्हाडी स्त्रीचे रूपही येथे पाहायला मिळते.

तसेच वऱ्हाडी स्त्री कर्तव्यदक्ष आहे. घरातील सर्व व्यक्तींची ती काळजी घेते. त्यांची सर्व कामे करते. नणंद असो सासू असो, पती, दिर, जाऊ असो या सर्वांबरोबर ती प्रेमाने वागते. घराबरोबर सामाजिक कर्तव्ये देखील ती पार पाडताना दिसते. कारण तिचे वैयक्तिक जीवन जरी बंदीस्त असले तरी तिचे भावविश्व मात्र मर्यादित नाही. यामुळे शिक्षण, स्वातंत्र्य, राजकारण, समाजकारण, जातीव्यवस्था

यांविषयी ती आपले विचार व्यक्त करताना दिसते. अगदी म. गांधी, आंबेडकर, इंदिरा गांधी यांच्याबाबतचा आदर ती व्यक्त करते. इंदिरा गांधींची सभा आपल्या अकोल्यालाच हवी इथपर्यंत विचार करणारं तिचं मन स्वतंत्र वाटतं. समाज व्यवस्थेने व कुटुंब व्यवस्थेने या वऱ्हाडी स्त्रीला दुय्यम स्थान दिले असले तरी दोन्ही पातळीवर ती सकारात्मक दृष्टीकोनातूनच विचार करते. शिक्षणाबद्दलही तिला आस्था आहे. आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दलही ती जागरूक वाटते. आधुनिक विचारांच्याकडे तिचा ओढा आहे. इंग्रजी राजवटीने केलेले अनेक बदल तिच्या मनाने स्वीकारले आहे. समाजातील बदल ती स्वीकारताना दिसते. सांस्कृतिक कार्यक्रमातही ती मनापासून भाग घेते, आनंदाने ती त्यामध्ये सहभागी होते कारण त्यातूनच तिला मोकळेपणा लाभतो. पण बऱ्याचवेळा पौराणिक, ऐतिहासिक कथा, देवदेवता यांच्यामध्ये ती रमताना दिसते. त्यातून तिची श्रध्दाळू, धार्मिक वृत्ती प्रकट होते.

अशी ही वऱ्हाडी स्त्री प्रेमळ आहे. सासरबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी, माहेरची आई व भाऊ यांच्या विषयी सतत गुणगान करणारी, सर्व नात्यांना बंधनात बांधून ठेवणारी, पतीला परमेश्वर मानणारी, स्वतंत्रपणे विचार करणारी, आधुनिकतेची कास धरणारी, घरादारासाठी सुखसमृध्दी चिंतणारी वऱ्हाडी स्त्री भारतीय स्त्रीचा एक उत्तम नमुना आहे. महाराष्ट्रातील इतर स्त्रियांसारखेच जीवन जगणारी पण काहीशी धाडसी, स्वतंत्र विचाराची, अतिशय धार्मिक जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी, आपल्या अनुभवातून अनेक चांगले विचार व्यक्त करणारी अशी काहीशी वेगळी भासते, जाणवते. कदाचित वऱ्हाडला लाभलेली कर्तृत्ववान स्त्रियांची परंपरा याला कारणीभूत असावी. ताराबाई, जिजाबाई, महदंबा, दुर्गा यांच्यासारख्या पराक्रमी स्त्रियांचा वारसा त्यांच्या पाठीमागे असेलच यात शंका नाही. महाराष्ट्रात होऊन गेलेल्या राणी लक्ष्मीबाईची आम्हावर छाप आजही आहे. तशीच ही वऱ्हाडमधील स्त्रीदेखील कर्तृत्ववान आहे. गरीबीची शाल तिला पांघरावी लागली तरी तिचा स्वाभिमान, तिची वृत्ती तिने सोडली नाही. आपले शील, चारित्र्य ती जपताना

दिसते. समाजात राहताना अंधश्रध्देला ती बळी पडली असली तरी नव सुधारणा, विचारांना तिने डावललेले नाही. तशी सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती पोषक लाभली नसली तरी त्यातूनही पर्याय शोधून वेगळी वाट तिने अवलंबिलेली दिसते म्हणूनच कदाचित ही गीतेही तिच्या वेगळ्या वाटेचं प्रदर्शन करत असतील.

किमान आपलं दु:ख ती चारचौघात तरी मांडू शकते. आपल्या आधुनिक विचारांच ती दर्शन घडवू शकते. यातच तिचे वेगळेपण दिसून येते. पण या संग्रहातील गीतांतील विविधता पाहिली की कितीतरी विषयावर या स्त्रिया भाष्य करताना दिसतात. त्यातूनच तिच्या चौकस बुध्दीचेही दर्शन घडते. घरातील जगाबरोबर बाहेरच्या जगाच तितकचं ज्ञान तिला आहे. त्यामुळे आपल्याकडील स्त्रियांइतकी ती बंदिस्त नसावी असे वाटते. कारण आजही आपल्या स्त्रियांना बाहेरचं जग किती ठाऊक असत? त्यात अतिप्राचीन वऱ्हाडी स्त्रीचे विचार, भावना आधुनिक तसेच स्वतंत्र म्हणायला हवेत.

त्याचबरोबर ही प्रबंधिका लिहिताना, अभ्यासताना लेखिका व पुस्तकाच्या संपादिका प्रतिमा इंगोले यांच्या विषयी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती नमूद करावीशी वाटते. प्रबंधाचे काम चालू असताना दोन वेळेला त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली, शंका विचारण्याच्या निमित्ताने फोन केले पण या प्रत्येक वेळी त्यांच्या मुखातून वऱ्हाडी बोली व तेथील संस्कृती, सण, विधी, रितीरिवाज, तेथील स्त्रीजीवन, लोकगीते यांविषयी भरभरून ऐकायला मिळाले. प्रत्यक्षात प्रथम भेट झाल्यावरही त्या बोलताना इतक्या एकरूप झाल्या होत्या, इतक्या हरवल्या होत्या की पुन्हा भानावर येऊन तुला कंटाळा तर येत नाही ना असं मला विचारलं. भुलाई, हादगा यांतील फरक, झेंडवाई, डहाका गीते, ठावा वगैरे गीतप्रकारांविषयी त्यांनी इतकी विस्तृत माहिती सांगितल्यावर आश्चर्य वाटलं. एवढच नव्हे तर फोनवरती देखील केव्हाही प्रश्न विचारल्यावर त्या लगेच माहिती सांगत त्यामुळे त्यांच्या गोष्टीच आश्चर्य वाटण साहजिकच होते. त्या या वऱ्हाडी भाषेशी, संस्कृतीशी, तेथील लोकगीतांशी खूपच

समरस झाल्या आहेत. त्यावरून लोकसाहित्य व लोकगीते यांबद्दलचा त्यांचा अभ्यास, त्यांची आवड दिसून येते. यातूनच आपणही याबद्दल काम करावं अशीच प्रेरणा मिळते त्यामुळे हेही नसे थोडके.